Vol 1 Issue 4 Jan 2012

ISSN No : 2249-894X

## *Monthly Multidisciplinary Research Journal*

# *Review Of Research Journal*

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Catalina Neculai
University of Coventry, UK

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.net**

Review Of Research
Vol.1,Issue.IV/Jan; 12pp.1-4  ISSN:-2249-894X

Research Papers

# सन 1857 चा उठाव आणि धुळे जिल्हा

***अनिल माणिकराव बैसाणे***
इतिहास विभाग प्रमुख, झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे .

## प्रास्ताविक

.

महाराष्ट्राच्या किंवा मराठी भाषिक प्रदेशाच्या दृष्टिने खानदेशचा भूभाग अतिशय महत्त्वपूर्ण असून प्राचीन, मध्ययुगीन आणि अर्वाचीन कालखंडात अनेकविध घटना या भागात घडल्या आहेत. महाराष्ट्रातील अति प्राचीन संस्कृती प्रामुख्याने खानदेशमध्ये आढळते. सातवाहन राजांच्या काळात व्यापारी चळवळीला खानदेशात प्रतिष्ठा प्राप्त झाली. सातवाहनानंतर आभीर राजांनी खानदेशच्या इतिहासात एक नवं दालन उघडले. आभीरांच्या अहिराणी भाषेचा व संस्कृतीचा एक आगळा ठसा खानदेशच्या भूभागावर उमटविलेला आढळतो. खानदेशच्या समाजजीवनाची चौकट यादवांच्या काळात निर्माण झाली.

मध्ययुगाच्या प्रारंभी खानदेशात फारुकी या मुस्लिम घराण्याची सुमारे 200 वर्षे राजवट होती. इ.स. 1600 च्या सुमारास मुघल सम्राट अकबराने फारुकीचा शेवट करून मुघल सत्ता प्रस्तापित केली. मात्र 1707 मध्ये औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मुघलबादशाही दुर्बल होत जावून 1764 च्या बक्सारच्या युद्धाने बादशाही आणि 1818 मध्ये महाराष्ट्रातील पेशवाई नष्ट होवून ब्रिटिश अमंल प्रस्थापित झाली. सन 1857 पर्यंत आपल्या देशावर ब्रिटिशांनी अन्याय अत्त्याचार केला. त्याचा सहज उद्रेक म्हणजे ब्रिटिशांविरूद्ध देशव्यापी उठाव झाला.

### *इ.स. 1857 ची कांती आणि खानदेष*

इ.स. 1600 मध्ये ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली आणि व्यापाराच्या निमित्तान भारतात आलेली कंपनी सत्ताधारी बनली. 1757 च्या प्लासीच्या लढाईत बंगालच्या नवाबाचा पराभव करून रॉबर्ट क्लाईव्हनं भारतात ब्रिटिश सत्तेचे बीज रोवले आणि मध्ययुगीन कालखंडातील अज्ञानी, धर्मभोळ्या व सामाजिकदृष्ट्या विभाजीत अशा भारतीय जनतेला ब्रिटिशांनी आपल्या धूर्त व चाणाक्ष राजनीतीने शृखंलाब़द्ध केले. एका व्यापारी कंपनीचे राजकीय सत्तेत रूपांतर झाले होते. भारतीय संस्थानिकांमध्ये ब्रिटिश सत्तेविरुद्धचा असंतोष बिटिश सत्तेच्या स्थापनेपासून रुजला होता. क्लाईव्ह नंतर आलेल्या प्रत्येक गव्हर्नर जनरलने भारतीयांमधील असंतोषात भरच घातली. तसेच दत्तक नामंजूर, संस्थाने विलिनीकरण व पेंशन रद्द यामुळे संस्थानिकांच्या मनामध्ये ब्रिटिश सत्तेविरुद्ध आकस वाढत गेला.[1]

इंग्लंडमध्ये औद्यागिक क्रांतीचे पर्व सुरु झाले होते. भारतीय भांडवलावर औद्योगिक क्रांती यशस्वी होवून मोठमोठे उद्योगधंदे सुरू झाले. भारतीय जनतेस ज्या प्रमाणात आर्थिक शोषणाची जाणीव होऊ लागली त्या प्रमाणात भारतीय राष्ट्रवाद आक्रमक होवू लागला. त्यातूनच दादाभाई नौरोजींनी आर्थिक शोषणाचा सिद्धांत मांडला. कंपनीच्या व्यापारी धोरणामुळे संस्थानाबरोबरच संस्थानातील ऊ़द्योगही बंद पडले. तसेच 1857 च्या क्रांतीस धर्मिक तणाव व ब्रिटिशांनी अंमलात आणलेल्या सामाजिक सुधारणांमुळे निर्माण झालेला असंतोष कारणीभूत असला तरी मूलभूत कारण म्हणजे लष्करातील असंतोष होय.

1857 च्या क्रांतीला इंग्रजांनी सैनिकाचे बंड म्हटलं तर काहींनी महान उठाव असे असले तरी ती स्वातंत्र्यासाठी झालेली पहिली क्रांती होती. अशा क्रांतीत खानदेशचा किती सहभाग होता. यासंबंधी मूळ साधनांवर आधरित डॉ. कायंदे यांनी शोधप्रबंध लिहिला आणि या क्रांतीत खानदेशवासियांचा मोठा सहभाग असल्याचे सिद्ध झाले. खानदेशातील आदिवासी भिल्लांनी 1857 च्या क्रांतीत फार मोठे योगदान दिले आहे. खानदेशातील आदिवासी भिल्लांवर इ. स. 1818 पूर्वी झालेल्या अमानुष अत्याचारातून विद्रोहाची भवना निर्माण झाल्याचे उल्लेख जी. सी. वाड संकलित पेशवा डायरीमधून तसेच गो. स. सरदेसाई संपादित पेशवे दप्तरातील काही ऐतिहासिक कागदप़त्रातून वाचावयास मिळतात. कंपनीच्या काळात खानदेशाच्या आदिवासी भिल्लांमध्ये विद्रोहाची भावना सारखी वाढीस लागल्याचे उल्लेख कंपनीच्या 1857 व 1858 च्या पॉलिटिकल डिपार्टमेंटच्या खंडातूनही वाचावयास मिळतात. तसेच भिल्लांसंबंधी पुणे, मुंबई येथील दप्तरखान्यातील अप्रकाशित मोडी कागदपत्रातून बरीच माहिती मिळते. खानदेशातील भिल्लांना इंग्रजांविरुद्ध चिथावणी देण्याचे काम दुसऱ्या बाजीराव पेशव्यांचा संगमनेर तालुक्यातील निमगांव जाळीचा सरदार त्रिंबकजी डेंगळे याने केले. 1818 ते 1831 या 14 वर्षाच्या काळात खानदेशातील भिल्लांनी इंग्रजांविरुद्ध आठ ते

Review Of Research
Vol.1,Issue.IV/Jan; 2012

नऊ वेळा सशस्त्र बंडे केली. या बंडाची सूत्रे त्र्यंबकजींनी आपल्या भावाकडे सोपवली होती. या उठावांत सुमारे आठ हजार भिल्लांनी भाग घेतल्याची नोंद एलफिन्स्टनच्या अहवालात आढळते.[2]

या भिल्लांचा बंदोबस्त करण्यासाठी आपली प्रतिष्ठा पणाला लावण्याचा चिकाटीचा प्रयत्न खानदेशातील कंपनीचा कलेक्टर आणि पॉलिटिकल एजंट कॅप्टन ब्रिग्ज याने केला. काझिसिंग नाईक हा एक भिल्ल असून कंपनी सरकारचा नोकर होता. त्याने बंडखोर, लुटमार करणाऱ्या भिल्लांचा बंदोबस्त करण्याकरिता इंग्रज अधिकाऱ्यांना खूप मदत केली. परंतु सरकारी सेवेत कार्यरत असतांना सेंधवा घाटात चोरी करतांना सापडलेल्या एका गुन्हेगाराची चौकशी करीत असतांना त्याला मार देता देता तो गुन्हेगार मरण पावला. त्यावेळी काझिसिंगावर खुनाचा आरोप ठेवण्यात येऊन त्याला 10 वर्षाची शिक्षा झाली. परंतु पुढे त्याला शिक्षेत सूट देण्यात येऊन 1855 मध्ये त्याची कैदेतून सूटका करण्यात आली. त्या काळात कंपनी सरकारविरुद्ध बंडाची सुरूवात झालेली होती. काझिसिंगने कंपनी सरकारची नोकरी सोडून बंड पुकारले आणि सरकारी खजिन्याची लूट करणे, छापे घालणे, सरकारी मालमत्ता नष्ट करणे इत्यादी प्रकार सुरू केले, भीमसिंग नाईक यांनेही सरकारी मालमत्ता नष्ट करणे इत्यादी प्रकार सुरू केले, भीमसिंगाने खानदेशातील सरकारी पोलिसांना दिलेल्या धमकीमुळे त्याला पकडण्याकरिता सरकारने एक हजार रुपयाचे बक्षिस जाहीर केले. तरीही भिमसिंग नाईक, काझिसिंग नाईक यांच्या नेतृत्वाखाली सुमारे 1500 भिल्लांनी शिरपूर तालुक्यात हल्ले करून लूटालूट केली. खानदेशच्या भिल्लांविरूद्ध कठोर उपाय योजण्याची शिफारस खानदेशच्या कलेक्टरने मुंबई इलाख्याच्या सरकारला कळविल्याची नोंद सरकारी दप्तरखान्यात आढळते. तसेच खानदेशातील व सेंधवा घाटातील भिल्लांनी सेंधवा घाटात सात लाखाचा खजिना लुटल्याची, टेलिफोनच्या तारा तोडल्याची आणि सरकारी टपाल कार्यालय लुटल्याच्या नोंदीचा उल्लेख वाचावयास मिळतो. इंग्रज आणि भिल्ल यांच्यात 10 एप्रिल 1858 मध्ये खानदेशात अंबापाणी येथे झालेला संघर्ष प्रसिद्ध आहे. 1857–58 च्या उठावात भिल्लांच्या स्त्रियांनीदेखील सहभाग घेतला होता. ही बाब उल्लेखनीय म्हणता येईल. या लढ्यात सुमारे चारशे भिल्ल स्त्रियांना इंग्रजांविरुद्ध कारवाया केल्याबद्दल पकडण्यात आले होते. त्यात काही राजपूत स्त्रियाही होत्या. खानदेशात वर्षभर भिल्लांनी धुमाकूळ माजविला होता. भिल्लांचा बंदोबस्त पडपशाही मार्गाने अथवा लष्करी सामर्थ्याच्या जोरावर करणे कठीण असल्याचे ओळखून भिल्लांना शरण येण्याचे व माफी देण्याचे, तसेच त्यांच्या स्त्रियांना सोडून देण्याचे अश्वासन देवून सरकारने भिल्लांचा संघर्ष मोडण्याचा प्रयत्न केला. तसेच डोंगरातील रस्त्याचे रक्षण करण्याची जबाबदारी या भिल्लांवर सोपविण्यात आली. थोडक्यात खनदेशातील भिल्ल जमात स्वतंत्र प्रवृत्तीची, बंडखोर व स्वातंत्र्यप्रिय होती हे लक्षात घेतले पाहिजे.[4]

### *स्वातंत्र्य चळवळीची वाटचाल आणि धुळे जिल्ह्याचा सहभाग राणीचा जाहीरनामा*

1857 च्या घटनेला काहींनी महान उठाव, इंग्रजांनी सैनिकांचे बंड तर स्वातंत्र्यप्रेमी भारतीयांनी याला स्वातंत्र्यासाठी झालेली पहिली क्रांती असल्याचे म्हटले आहे. आपसांतील फुटीमुळे क्रांतीस अपयश आले हे जरी खरे असले तरी राणी व्हिक्टोरियाच्या जाहिरनाम्यानंतर हिंदुस्थनात इंग्रजांची उदारमतवादी राजवट सुरू होईल अशी जनतेची आशा बळावली. ईस्ट इंडिया कंपनीची राजवट समाप्त होवून एका युगाचा शेवट झाला आणि दुसऱ्या नव्या युगाची – राणी व्हिक्टोरीयाने नेमलेल्या प्रतिनिधीची व्हाईसरॉयची राजवट सुरु झाली. पाश्चात्य उदारमतवादाचा हळूहळू प्रभाव पडू लागला. त्यातूनच हिंदुस्थानच्या पारतंत्र्यांची खंत वाटणारी एक सुशिक्षित पिढी निर्माण झाली. नव्या ब्रिटिश सरकारचा भारताविषयीच्या धोरणात बदल झाला. भारतीयांना सुधारणांची हमी देण्यात आली. धार्मिक, राजकीय क्षेत्रामध्ये हस्तक्षेप न करण्याचे जाहीर करण्यात आले. तसेच येथून पुढे ब्रिटिशांचे राज्य हे भारतीयांच्या कल्याणासाठीच आहे असे सांगण्यात आले.

### *सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळी*

1857 च्या स्वातंत्र्य संग्रामात भारतीयांना जरी अपयश आले असले तरी स्वातंत्र्य प्राप्तीसाठी होणारे प्रयत्न थांबले नाहीत. अशा प्रकारच्या संघर्षासाठी भारतीय जनतेचा भरघोस पाठींबा असला पाहिजे याची त्यांना जाणीव झाली आणि त्यामधूनच सामाजिक व धार्मिक प्रबोधनाच्या चळवळी उदयास आल्या.. या सुधारणा चळवळींनी भारतीयांना एकत्र आणण्यास फार मोठा हातभार लावला. नवा समाज निर्माण केला. भारतीयांचे प्रबोधन घडविण्यात अनेक संस्थांनी आणि लहानथोर नेत्यांनी अथक प्रयत्न केले. आर्यसमाज, रामकृष्ण मिशन सारख्या संस्थांनी भारतीय समाजाला एक होण्याचे आवाहन केलं आणि या सामाजिक व धार्मिक सुधारणांचा परिणाम होऊन राष्ट्रवादाची निर्मिती झाली. वैचारिक जागृती झाली आणि खानदेशवादी संघटनेला पुरक वातावरण निर्माण झाले. खानदेशसह केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण हिंदुस्थानात राष्ट्रभक्तीची भावना हळूहळू निर्माण होवून न्या. महादेव गोविंद रानडे यांनी एक नवे चैतन्य निर्माण केले. धुळ्यासारख्या मागासलेल्या आदिवासींचे प्रमाण फार मोठे असलेल्या आणि राजकीय अज्ञान असलेल्या खानदेशात जनजागृती व लोकसंघटन करण्याचे कार्य न्या. रानडे यांनी केले. खानदेशात स्वातंत्र्याच्या चळवळीची मुहूर्तमेढ कोणी रोवली याबद्दल निश्चित विधान करता येणे शक्य नसले तरी वकील वर्ग व वृत्तपत्र क्षेत्रात काम करणारी मंडळी याबाबतीत अग्रेसर होती यात शंका नाही. 5 या सर्वांच्या सामुहिक प्रयत्नातून स्वातंत्र्य चळवळीची बीजे खानदेशात रोवली गेली. याबरोबरच पाश्चिमात्य शिक्षण व इंग्रजी भाषेचा अभ्यास अति सक्तीच्या माध्यमामुळे भारतीयांना देवाणघेवाणीसाठी इंग्रजी भाषा उपलब्ध झाली व त्यामुळेच भारतीयांमध्ये एकत्र येण्याची जाणीव निर्माण झाली हे नाकारता येणार नाही.

### *निष्कर्ष :*

देशभर क्रांतीचे वारे वाहत होते. ब्रिटिशांच्या अन्याय–अत्त्याचाराचा कहर होत होता. राजकीय दडपशाही, सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रातील हस्तक्षेप, आर्थिक शोषण, दत्तक वारस नामंजूर करून राज्य किंवा संस्थाने खालसा करण्याचे धोरण यामुळे ब्रिटिश राजवटीविरूद्ध कमालीचा असंतोष निर्माण झाला होता. या असंतोषाचा उद्रेक होऊन ब्रिटिशांविरूद्ध भारतीय जनतेने देशव्यापी उठाव केला. याच जाणिवांनी धुळे जिल्ह्यातील लोकांनीही ब्रिटिशांविरूद्ध बंड पुकारले. यात भिल्ल लोक उठावाच्या अग्रणी होते हे महत्त्वाचे होय.


### *संदर्भ*

1.पवार जयसिंगराव, पवार मंजुश्री, आधुनिक भारताचा इतिहास, अरूंधती प्रकाशन, कोल्हापूर, 2001, पृ. 110–111.

2.पांडे डॉ. मधुकर, खानदेशातील स्वातंत्र्य चळवळ, समाविष्ट – खानदेशचा सांस्कृतिक इतिहास (संपा.), डॉ. मु. ब. शहा, का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे, खंड –3 व 4, जानेवारी 2004, पृ. 14–15.

3.चौधरी कि. का., जळगाव जिल्हा : महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, महाराष्ट्र शासन, मुंबई, 1944, पृ. 112–113.

4.पाटील डॉ. भी. ना., खानदेशातील समाजप्रबोधनाची चळवळ (1900–1950), 2005, पृ. 517–518.



*अनिल माणिकराव बैसाणे*
माजी इतिहास विभाग प्रमुख, झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे .

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.net